# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

पुनर्विलोकन अर्ज ९२ / २०२४

(मुळ अभिवेदन क्र. ४४ / २०२४ च्या अभिवेदनाबाबत )

कृषीपंप वीज जोडणी खंडीत करणेबाबत

तानाजी कृष्णा पवार ........................................ अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, फलटण (महावितरण) .................... प्रतिवादी १

अंकुश कृष्णा पवार .................... प्रतिवादी २

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- १) तानाजी कृष्णा पवार,
२) अजित तानाजी पवार,

प्रतिवादी १ तर्फे :- १) प्रदिप ग्रामोपध्याय, कार्यकारी अभियंता, फलटण
२) शिवाजी रेड्डी, उपकार्यकारी अभियंता

प्रतिवादी २ तर्फे : १) अंकुश कृष्णा पवार
२) प्रमोद अंकुश पवार

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २५ जून २०२४

आदेश पारित दिनांक :- १९ जुलै २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम २२ नुसार अभिवेदन क्र. ४४/२०२४ बाबत मा.विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजीच्या पारीत आदेशाविरूध्द अपिलार्थींनी सदरचे पुनर्विलोकन अभिवेदन दिनांक १७ मे २०२४ रोजी दाखल केलेले आहे.

२. मा. विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक ३० एप्रिल २०२४ च्या (अभिवेदन क्रं. ४४/२०२४) आदेशान्वये मंचाने जारी केलेल्या आदेशात फेरफार वा हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नसल्याचा निर्णय देताना मंचाचा आदेश कायम ठेवण्यात आला आहे.

३. अपिलार्थीने आपल्या पुनर्विलोकन निवेदनातील व दिनांक २६ जून २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे झालेल्या सुनावणी दरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी हे मुक्काम पोष्ट भोळी, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथील शेती ग्राहक (क्रं.२०३३३०००२७१७) आहेत. अपिलार्थी यांची गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ या त्यांच्या मिळकतीच्या बांधावर मालकी हक्काची विहीर आहे. सदर विहीरीचा काही भाग हा गट क्रं.२५४ मध्ये येत आहे. गट क्रं.२५३ ही मिळकत अपिलार्थी व प्रतिवादी २ यांनी मिळून खरेदी केलेली आहे. तसेच, गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ या मिळकतीमध्ये खरेदी केल्यानंतर सरस व निरस मनाने तोंडी वाटप झालेले आहे. गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ ची वहीवाट ही पूर्व-पश्चिम आहे. गट क्रं.२५३ या मिळकतीच्या पुर्वेकडील बाजूस अपिलार्थींना आडवे क्षेत्र दिलेले आहे तर प्रतिवादी २ यांना पश्चिमेकडील बाजूस आडवे क्षेत्र दिलेले आहे; अपिलार्थींना दिलेल्या क्षेत्रामध्ये अपिलार्थी यांनी सन १९९५ साली स्वखर्चाने विहीर खणली आहे व त्या विहिरीवर त्यांनी मोटरपंप बसविलेला आहे.

- गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ मध्ये अपिलार्थींनी त्यांच्या हिस्याला आलेल्या जागेत स्वतंत्र विहीर खणलेली आहे. गट क्रं.२५४ मध्ये अपिलार्थीच्या नावे विहीर पडीची नोंद झालेली नसून, तसेच ती गट क्रं.२५३ मध्ये ही अपिलार्थीच्या नावे झालेली नाही. सदर बाबीचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी २ यांनी सन २०२३ मध्ये स्वतः मोबाईल ॲपच्या आधारे विहीर पड क्षेत्राची नोंद लावून तथाकथीत वीज जोडणी घेतलेली आहे. अपिलार्थीने दिनांक १४ ऑगष्ट २०१५ रोजी विहिरीवर ३ एचपी चे कनेक्शन घेतलेले आहे.

- प्रतिवादी २ यांची सदर गटामध्ये त्यांच्या मालकीची विहीर नसतानाही त्यांनी महावितरणकडे अर्ज करुन त्यांच्या नावे वीज जोडणी घेण्याचा प्रयत्न केला. सदर विहीरीवर वीज जोडणी करीता महावितरणचे अधिकारी वा कर्मचारी गेले असता, अपिलार्थीने सदर विहिरीवर वीज जोडणी देऊ नये म्हणून, शाखा कार्यालय वाठार येथे दिनांक १६ मार्च २०२३ रोजी लेखी तक्रार दिली. सदर वीज जोडणी घेताना प्रतिवादी २ यांनी विहिरीबाबतची कागदपत्रे वा विहीरीच्या मालकी हक्काची कागदपत्रे जोडली नसून सदर गटातील सहधारकांची परवानगी देखील घेतलेली नाही.

- प्रतिवादी २ यांनी दिनांक १ मे २०२३ रोजी विहीरीवर घेतलेली सदर वीज जोडणी बेकायदेशीर असून विहीरीमध्ये बसविलेल्या पंपामार्फत पाणी उपसा करीत आहेत, त्यामुळे अपिलार्थींना त्यांच्या पिकांना पुरेसे पाणी देता येत नाही. परिणामी अपिलार्थीच्या पिकाचे नुकसान होत आहे.

➢ प्रतिवादी १ ने प्रतिवादी २ यांना बनावट व फेरफार केलेल्या कागदपत्रांच्या आधारे अनधिकृत वीज पुरवठा दिला म्हणून अपिलार्थीने खंडाळा येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात (रे.दि.मु.न. १५४/२०२३) दावा दाखल केला आहे.

➢ पुनर्विलोकन अर्जात नमुद केलेले मुद्दे खालीलप्रमाणे :-

- **खोटे दस्तऐवज** : प्रतिवादी २ यांना अपिलार्थीच्या विहिरीवर अदा केलेले कनेक्शन हे त्यांनी सादर केलेल्या खोटया नोंदीच्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे दिलेले आहे, याबाबत मुळ आदेशात योग्य ती दखल घेतली नाही.
- **स्वाक्षरी नसलेले दस्तऐवज** : सर्वेक्षण अहवाल आणि स्वयं-घोषणा प्रतिज्ञापत्र इत्यादी बाबत महावितरण लोणंद उपविभाग यांच्या सह्या नाहीत. ते प्रतिवादी यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
- **पोल नंबर मधील तफावत** : महावितरणच्या वीज देयकावरील पोलची नोंद व प्रत्यक्ष वीज जोडणीसाठी लागलेल्या पोल वाटपाच्या नोंदी यात ठळकपणे तफावत दिसत आहे. सर्व्हे अहवालामध्ये सुध्दा पोल क्रमांक व ग्राहकाच्या तपशीलाच्या अचूकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.
- **विसंगत सर्वेक्षण अहवाल** : अस्तित्वात नसलेल्या विहिरीचे सर्वेक्षण आणि प्रक्रियेचे निराकरण करण्याच्या वीज जोडणीच्या वॉरंट स्पष्टीकरणासाठी अर्ज यांच्यातील टाईमलाईनमधील तफावत दिसून येते. गट क्र.२५४ साठी वीज जोडणी अर्ज मंजूरी आणि त्यानंतर ती नाकारण्याच्या घटनाक्रमामध्ये पारदर्शकता दिसून येत नाही.
- **दस्तऐवजामधील फेरफार** : दस्तऐवजातील फेरफार आणि बदलांची निरीक्षणे, दस्तऐवज प्रक्रियेबाबत तसेच, वीज जोडणी स्थानातील विसंगती वाटप प्रक्रीयेच्या अचुकतेबाबत शंका निर्माण होत आहे.
- **महावितरण लोणंद कार्यालियास कायदेशीर नोटीस** : बेकायदेशीर वीज जोडणीस कायदेशीर नोटीस देऊन आक्षेप घेऊनही वीज जोडणी मंजूर केली याबाबत; कुठेही पारदर्शकता दिसून येत नाही. महावितरणच्या सातारा मंडल कार्यालयाच्या अनधिकृत वीज जोडणीच्या सुचनेचे पालन केले नाही.

➢ अपिलार्थीने असेही नमुद केले की, सदर पुनर्विलोकन अभिवेदनाचा विचार करण्यात यावा व महावितरणच्या फसव्या व संशयास्पद कारभारावर लक्ष देणे गरजेचे आहे. अपिलार्थीने विनंती केली की, सदर प्रकरणाचा सखोलपणे विचार करून न्याय देण्यात यावा.

४. प्रतिवादी १ (महावितरणने) त्यांच्या निवेदनातील व दिनांक २६ जून २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे झालेल्या सुनावणी दरम्यान मांडलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

➢ महावितरणने नमुद केले की, अपिलार्थीने अभिवेदन क्रं. ४४ / २०२४ च्या दिनांक ३० एप्रिल २०२४ च्या आदेशाने समाधान न झाल्याने अपिलार्थीनी सदरचे पुनर्विलोकन अभिवेदन दिनांक १७ मे २०२४

रोजी दाखल केले. प्रतिवादी २ यांच्या नावे गट क्र. २५३ मध्ये दिनांक १ मे २०२३ रोजी ग्राहक क्रं.२०३३३००३२२९२ ने देण्यात आलेली वीज जोडणी चुकीच्या पध्दतीने देण्यात आली आहे. तरी सदर वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत करण्यात यावी यासाठी अभिवेदन दाखल केले आहे.

➢ प्रतिवादी २ यांने शेतीपंपासाठी गट क्रं.२५४ मध्ये दिनांक ३ ऑगष्ट २०२२ रोजी वीज जोडणीचा अर्ज केला होता. परंतू, सदर गटामध्ये विहीरीची नोंद नसल्यामुळे, शाखा कार्यालय वाठार कॉलनी कार्यालयाने प्रतिवादी २ यांना कल्पना देऊनच सदरचा अर्ज नामंजूर केला. त्यांनतर दिनांक २८ मार्च २०२३ रोजी श्री. अंकुश कृष्णा पवार यांनी गट क्रं.२५३ मधील विहीरीवर शेतीपंपासाठी वीज जोडणीचा अर्ज केला. सदर अर्जासोबत जोडलेल्या सात-बारा चे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, श्री. अंकुश कृष्णा पवार यांचे नावे फेरफार नोंद नं.९१८ चे भोगवटादार सदरी नमुद आहे, तसेच, जलसिंचनाचे साधन म्हणून विहिरीची नोंद असल्याचे आढळते. सर्व नियमाचे पालन करून दिनांक १ मे २०२३ रोजी प्रतिवादी क्रं.२, श्री. अंकुश कृष्णा पवार यांना ३ एचपी कृषीपंपाचे कनेक्शन (ग्राहक क्रं.२०३३३००३२२९२) देण्यात आले. श्री. अंकुश कृष्णा पवार यांनी दिनांक ७ जून २०२३ रोजीचे रु.१००/- च्या जनरल स्टँप पेपरवर सादर केलल्या हमीपत्रात नमुद केले की, भविष्यात त्यांचे नावे वीज जोडणी दिल्यास कोणतीही तक्रार / हरकत आल्यास त्याची जबाबदारी ही सर्वस्वी प्रतिवादी क्रं.२ श्री. अंकुश कृष्णा पवार यांची राहील.

➢ श्री. तानाजी कृष्णा पवार यांनी श्री. अंकुश कृष्णा पवार यांच्या विरुध्द खंडाळा येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात रे.दि.मु.न. १५४/२०२३ नुसार केस दाखल केलेली आहे. सदरच्या दाव्यावरून असे निदर्शनास येते की, अपिलार्थींनी मा. विद्युत लोकपाल (मुंबई) न्यायासनाकडे मागितलेली दाद न्यायप्रविष्ठ आहे. अशा परिस्थितीत सदर अपिल विचारात घेता येणार नाही. तसेच, अपिलार्थी हे 'ग्राहक' या व्याख्येत बसत नाहीत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० मधील विनियम ९.७ मध्ये तक्रारदार, तक्रार व गाऱ्हाणे यांच्या व्याख्येतही बसत नाही.

➢ सदर तक्रार ही, मा. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, खंडाळा यांचे न्यायालयात वडीलोपार्जीत जागेसंबधात वीज जोडणीबाबतचा दावा प्रलंबित आहे. त्यामुळे अपिलार्थीस श्री. अंकुश कृष्णा पवार यांच्या वीज जोडणीबाबत काही हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या सक्षम न्यायालयाकडे वा अन्य प्राधिकारणाकडे दाद मागावी.

➢ महावितरणने नमुद केले की, (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम २२ नुसार कोणताही नवीन मुद्दा उपस्थित केलेला नाही, त्यामुळे, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे ही विनंती.

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

५. प्रतिवादी क्र.२ अंकुश कृष्णा पवार यांनी त्यांच्या निवेदनातील व दिनांक २६ जून २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे झालेल्या सुनावणी दरम्यान मांडलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- प्रतिवादी क्र.२ अंकुश कृष्णा पवार यांनी नमुद केले की, अपिलार्थीने मा. विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक ३० एप्रिल २०२४ चा (अभिवेदन क्रं. ४४/२०२४) आदेश गांभीर्याने घेतलेला नाही वा आदेशाचे आकलन झालेले नाही. सदरील केस ही अपिलार्थीच्या बाबतीत नसून ती प्रतिवादी २ यांच्याबद्दल आहे आणि ती 'गाऱ्हाणे' च्या व्याख्येत बसत नसल्यामुळे यापूर्वीच मा. विद्युत लोकपाल (मुंबई) तक्रार फेटाळली आहे.

- अपिलार्थीचा पुनर्विलोकन अर्ज हा चुकीचा व पुर्णतः दिशाभुल करणारा आहे. अपिलार्थीने पुन्हा त्याच त्याच मुद्द्यांचा उहापोह केला आहे, की, जे, दिनांक ३० एप्रिल २०२४ च्या (अभिवेदन क्रं. ४४/२०२४) आदेशान्वये फेटाळले आहेत. प्रतिवादी क्र.२ यांनी सदर विहिरीवर घेतलेली वीज जोडणी ही सनदशीर मार्गानेच घेतलेली आहे.

- प्रतिवादी क्र.२ यांनी नमुद केले की, सदर विवादीत विहीरीवर दिलेल्या वीज जोडणीबाबत खंडाळा येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात (रे.दि.मु.न. १५४/२०२३) दावा चालू असून तो प्रलंबित आहे. सदर बाब अपिलार्थीने मा. विद्युत लोकपाल व महावितरण पासून जाणून बुजून लपवून ठेवली, कारण, अपिलार्थीचे अभिवेदन दाखल करुन घेण्याचे नाकारले जाईल याची त्यांना जाणीव असावी आणि मा. विद्युत लोकपाल या न्यायासनाची दिशाभुल केली आहे.

- अपिलार्थीचा एकमेव उद्देश म्हणजे प्रतिवादीना उपद्रव देणे हाच आहे. त्यासाठी सरकारी सुविधांचा गैरवापर करणे, सरकारी यंत्रणांना वेठीस धरणे व त्यांचा वेळ घालविणे हाच असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या हेतु पृष्ठर्थ पिंपरी चिंचवड महानगरपालीका अधिकारी यांना अपिलकर्ता व प्रतिवादी क्र.२ यांच्या पुणे येथील राहत्या घराबाबत केलेल्या तक्रारीची प्रत सोबत जोडली होती. पिंपरी चिंचवड महानगरपालीका अधिकारी यांनी अपिलकर्ता यांचे दुष्ट हेतू व उपद्रवकारक वागणे लक्षात घेता त्यांची तक्रार फेटाळून लावण्यात आलेली आहे.

- प्रतिवादी क्र.२ यांनी नमुद केले की, मा. विद्युत लोकपाल (मुंबई) यांचा निर्णय कायम करण्यात यावा, व अपिलार्थीस समज देऊन त्यांची तक्रार फेटाळण्यात यावी, ही विनंती.

**विश्लेषण व निर्णय.**

६. दोन्ही पक्षकारांची बाजू ऐकण्यात आली व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

म.वि.नि.आ.

७. अपिलार्थीने नमुद केले की, प्रतिवादी २ यांना अपिलार्थीच्या विहिरीवर देण्यात आलेली वीज जोडणी ही त्यांनी सादर केलेल्या खोटया नोंदीच्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे दिलेली आहे. सर्वेक्षण अहवाल आणि स्वयं-घोषणा प्रतिज्ञापत्रावर महावितरणच्या अधिकारी यांच्या सह्या नाहीत. महावितरणच्या वीज देयकावरील पोल व प्रत्यक्ष वीज जोडणीसाठी लागलेल्या पोल याच्या नोंदीत तफावत दिसते. सर्व्हे अहवालामध्ये सुध्दा पोल क्रमांक व ग्राहकाच्या तपशीलाच्या अचूकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. अस्तित्वात नसलेल्या विहिरीचे सर्वेक्षण आणि प्रक्रियेचे निराकरण करण्याच्या वीज जोडणीच्या वॉरंट स्पष्टीकरणासाठी अर्ज यांच्यातील टाईमलाईनमधील तफावत दिसून येते. गट क्र.२५४ साठी वीज जोडणी अर्ज मंजूरी आणि त्यानंतर ती नाकारण्याच्या घटनाक्रमामध्ये पारदर्शकता दिसून येत नाही. दस्तऐवजातील फेरफार आणि बदलांची निरीक्षणे, दस्तऐवज प्रक्रियेबाबत तसेच वीज जोडणी स्थानातील विसंगती वाटप प्रक्रीयेच्या अचुकतेबाबत शंका निर्माण होत आहे. बेकायदेशीर वीज जोडणीस कायदेशीर नोटीसीद्वारे आक्षेप घेऊनही वीज जोडणीस मंजूरी दिली. महावितरणच्या सातारा मंडल कार्यालयाच्या अनधिकृत वीज जोडणीच्या सुचनेचे पालन केले नाही.

८. अपिलार्थीने पुनर्विलोकनाच्या निवेदनात व सुनावणी दरम्यान नमुद केलेले मुद्दे यांपुर्वी देखील मुळ अभिवेदनात मांडलेले होते. अपिलार्थीद्वारे सदर पुनर्विलोकन अर्जात कोणतेही नवीन मुद्दे उपस्थित केलेले नाहीत; की, ज्यामुळे मुळ आदेशात बदल करणे गरजेचे आहे. पुनर्विलोकन याचिकेची व्याप्ती ही मर्यादित असते; मात्र, अपिलार्थी या ठिकाणी पुनर्विलोकन याचिकेच्या माध्यमातून संपूर्ण प्रकरणाची पुनश्चः सुनावणी घेण्याची विनंती करीत आहेत, असे, प्रथम दर्शनी दिसते. मात्र, मुळ आदेशांचा नव्याने आढावा घेण्याचे कोणतेच कारण समोर आलेले नाही. शिवाय, काही तथ्ये किंवा कायदेशीर स्थिती जर स्पष्ट नसेल, वाद विवाद आणि युक्तिवाद यात स्पष्टता येण्यास वेळ लागत असेल; तर, ती बाब निर्णय प्रक्रियेत 'त्रुटी' मानली जाऊ शकत नाही. सदर बाब अपिलामध्ये पुनर्विलोकनाच्या बाबतीत बसू शकत नाही.

९. ग्राहक गाऱ्हाणे विनियम, २०२० मधील विनियम २२ मध्ये आदेशाचे पुनर्विलोकना बाबत खालील प्रमाणे तरतुद आहे :-

*"२२ विद्युत लोकपालाच्या आदेशाचे पुनर्विलोकन :*

*२२.१ विद्युत लोकपालाच्या आदेशाने बाधीत झालेली कोणतीही व्यक्ति, वितरण परवानाधारकासह, आदेशाच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत अशा आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी त्याच विद्युत लोकपालाकडे खालील परिस्थितीत, अर्ज करील:*

*ए. जेथे कोणत्याही अपिलास प्राधान्य देण्यात आले नाही.*

*बी. अभिलेख्यावरुन चूक किंवा दोष असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्यास.*

*सी. एखादी नवीन आणि महत्वाची बाब किंवा पुरावा मिळाला, जो योग्य काळजी घेऊनही तिला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश पारीत करण्यात आला त्या वेळेस सादर करु शकला गेला नाही.*

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

*२२.२ अशा पुनर्विलोकनासाठीच्या अर्जात ती बाब किंवा पुरावा, जो योग्य काळजी घेऊनही अर्जदाराला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश देण्याच्या वेळेस सादर करू शकला गेला नाही, किंवा अभिलेखावरून चुक किंवा दोष असल्याचे सकृतदर्शनी दिसते त्याबाबत, स्पष्टपणे नमुद करण्यात येईल.*

*२२.३ पुनर्विलोकन अर्जासोबत विद्युत लोकपाल निश्चित करेल अशी कागदपत्रे, पुष्टयर्थ माहिती आणि निवेदने जोडण्यात येतील.*

*२२.४ विद्युत लोकपालास जर पुनर्विलोकनासाठी पुरेसे कारण नसल्याचे वाटल्यास, विद्युत लोकपाल असा पुनर्विलोकन अर्ज फेटाळेल.*
*परंतू असे की, अर्जदाराला त्याची बाजु मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणताही अर्ज फेटाळण्यात येणार नाही.*

*२२.५ जर विद्युत लोकपालाचे असे मत झाले की, पुनर्विलोकन अर्ज मंजूर करणे योग्य आहे, तर विद्युत लोकपाल तो मंजूर करेल. परंतू असे की, पुनर्विलोकनाचा अर्ज ज्या आदेशाच्या संदर्भात करण्यात आला आहे त्याच्या समर्थनार्थ उपस्थित राहणे व त्याची बाजू ऐकली जाणे शक्य व्हावे म्हणून, विरोधी पक्षकाराला पुर्व-सूचना दिल्याशिवाय असा अर्ज मंजूर केला जाणार नाही."*

१०. अपिलार्थी, प्रतिवादी १ व २ यांनी मांडलेल्या मुद्दयांचा या आधीच्या अभिवेदन क्रं.४४/२०४४ मध्ये पुर्णतः समावेश केलेला असून सर्व बाबी, मुद्दे गुणवत्तेशी सांगड घालून विचारात घेतलेले आहेत. अपिलार्थींनी त्यांच्या दिनांक १७ मे २०२४ रोजीच्या पुनर्विलोकन अर्जात कोणतेही नवीन मुद्दे मांडलेले वा उपस्थित केलेले नाहीत. तसेच, आदेश अवलोकना करीता कोणतेही 'पुरेसे कारण' असल्याचे स्पष्ट वा निदर्शनास आलेले नाही की, ज्यामुळे मुळ आदेशाच्या निर्णयाबाबत फेरविचार करावा लागेल. त्यामुळे त्याच त्याच कारणासाठी शासकीय यंत्रणेचा वेळ वाया घालविला याबाबत हे न्यायासन खेद व्यक्त करीत आहे. अपिलार्थीचे अभिवेदन रु.२०००/- च्या कॉस्टसह निकाली काढण्यात येत आहे. अपिलार्थींना आदेशीत करण्यात येत आहे की, आकारण्यात आलेली रक्कम रु.२०००/- विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या कार्यालयात हा आदेश पारित झाल्याच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत जमा करावी.

११. अपिलार्थीचे गाऱ्हाणे नामंजूर करण्यात येत असून व निकाली काढण्यात येत आहे .

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)